तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात मोडी लिपी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र इतिहास अधिविभागाच्या वतीने मोडी लिपी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. गुरुवार १० ते २६ ऑगस्ट या कालावधीत प्रवेश प्रक्रिया होणार आहे. शिवपूर्वकाळापासून ते स्वतंत्रकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबरच मोडी लिपी मुख्यलिपी आहे. त्या काळातील इतिहास अभ्यासण्यासाठी ही लिपी ज्ञात असल्याशिवाय संशोधन होऊ शकत नाही. तसेच त्या काळातील कोणत्याही प्रशासकीय नोंदीकरिताही ही लिपी ज्ञात असणे अपरिहार्य आहे. याची गरज लक्षात घेऊन सदरचा अभ्यासक्रम तयार केला आहे. याचा सदर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी-विद्यार्थीनी, इतिहास संशोधक, इतिहास प्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

तरूण भारत

# सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठातर्फे उद्‌बोधन वर्ग

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी हिंदी, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र) एम.कॉम., एम. एस्सी व (गणित) या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या अनुषंगाने बेळगांव येथील सीमा भागातील विद्यार्थी, गृहिणी, कामगार, शेतकरी यांना माहिती मिळावी, यासाठी सोमवारी (१४) रोजी सकाळी ११ वाजता तुकाराम महाराज सामाजिक सांस्कृतिक भवन, ओरिटल स्कूल जवळ बेळगाव येथे उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

समन्वयक प्रा. डॉ. के. बी. पाटील उद्‌बोधन वर्ग घेणार असून मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे सचिव, माजी महापौर मालोजी अष्टेकर यांच्या अध्यक्षतेखाली व उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, कॉम्रेड आनंद मेणसे, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीचे खजिनदार प्रकाश मरगळे, सहाय्यक प्रा. डॉ. सचिन भोसले, डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. सुशांत माने, डॉ. मुफीद मुजावर यांच्या उपस्थितीत होणार आहे.